महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**

राष्ट्रीय सेवा योजना

**विशेष श्रमसंस्कार शिबिर**

दिनांक 22 फेब्रुवारी ते 28 फेब्रुवारी 2025

**अहवाल**

**22 फेब्रुवारी, 2025**

शनिवार दि. 22 फेब्रुवारी, 2025 **उद्घाटन समारंभ**

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर हुबालवाडी येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन हुबालवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. मंगल बाबुराव हुबाले यांच्या हस्ते झाले. या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वाळवा पंचायत समिती, वाळवाचे ग्राम विस्तार अधिकारी मा.श्रीधर कुलकर्णी हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योगपती बॉम्बे स्टीलचे मालक व राजारामबापू बँकेचे माजी संचालक माननीय बाबुराव तुकाराम हुबाले हे होते. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये ग्रामपंचायत सदस्य सौ. रेखाताई पवार, अंकुश घाडगे, मधुकर हुबाले, कृष्णा हुबाले, प्रकाश शिंदे, सुकुमार हुबाले, अधिकराव जाधव, जयकर पवार, लालासो पवार, अक्षय फुलारे, केशव हुबाले, संजय विठ्ठल हुबाले (तात्या), माननीय सुनील फुलारे सह सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रविवार दि. 23 फेब्रवारी 2025**

रविवार दिनांक 23 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी बिरोबा मंदिराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी दुसऱ्या मजल्यावर ते सुमारे 5000 ते 6000 विटा स्थलांतरीत केल्या. तसेच मंदिराच्या आसपासची स्वच्छता ही केली. स्वयंसेविकांनी गुगल फॉर्मच्या माध्यमातून हुबालवाडी गावातील सुमारे 350 कुटुंबांचा सर्व्हे केला. त्यामध्ये पी.एम. सुर्यघर योजना संख्या, कुटुंबातील अपंग व्यक्ती, मतदान ओळखपत्र, आभा व आयुष्यमान भारत कार्ड, रेशन कार्ड, पी.एम. किसान योजना, फार्मर आयडी इत्यादी माहिती गोळा करण्यात आली. सायंकाळच्या सत्रामध्ये अंतरराष्ट्रीय पर्यावरण तज्ञ डॉ. अनिल पाटील पुढारी पत्रकार पणजी यांचे ‘बदलत्या पर्यावरणाचा मानवी जीवनावरील परिणाम’ या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सरपंच कृष्णा हुबाले हे उपस्थित होते या यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये राजेंद्र हुबाले व डांगबाबा शिंदे हे उपस्थित होते.

**24 फेब्रुवारी 2025**

सोमवार दि. 24 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी बिरोबा मंदिराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी दुसऱ्या मजल्यावरती सुमारे 2000 विटा स्थलांतरीत केल्या तसेच मंदिराच्या गाभाऱ्याचा भाग स्वच्छ करून आतमध्ये बाहेरील विटा स्थलांतरित केल्या. तसेच शिबिराच्या ठिकाणी प्रकाश मेमोरियल क्लीनिकचे डॉक्टर सतीश गोसावी यांचे हुबालवाडी ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात बहे, हुबालवाडी, खरातवाडी या गावातील सर्व

ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबील, रक्तदाब, मधुमेह, ई. सी. जी. इत्यादीची तपासणी करण्यात आली. दुपारच्या सत्रामध्ये सांगली जिल्हा एनएसएसचे माजी समन्वयक प्रोफेसर डॉ. संतोष खडसे यांचे 'व्यक्तिमत्व विकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अभिसरण युथ एक्सचेंज प्रोग्रॅम अंतर्गत यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे झालेला शिबिरातील स्वयंसेवक श्री. अभिजीत लोहार याने आपले अनुभव कथन केले. सायंकाळच्या सत्रामध्ये ॲड उदयकुमार मोरे शिरोळ यांचे 'सह्याद्रीच्या कुशीत हवा शिवरायांचा जन्मनवा' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी अध्यक्ष श्री. केशव विलास हुबाले सर उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती मध्ये मा. संजय सीताराम हुबाले, मा. संजय भिकू हुबाले, व मा. सुनील फुलारे उपस्थित होते.

25 फेब्रुवारी 2025

मंगळवार दि. 25 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी हुबालवाडी येथील स्मशानभूमी परिसराची स्वच्छता व सफाई केली तसेच गावातील गटारातील गाळ काढून गटारे स्वच्छ व प्रवाहमय केली. कलानगर या लमान वस्तीमधील रस्ते स्वच्छता ही केली. तसेच अभिसरण युथ एक्सचेंज प्रोग्रॅम अंतर्गत यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे झालेला शिबिरातील स्वयंसेवक श्री ओमकार फिरमे याने आपले अनुभव कथन केले. सायंकाळच्या सत्रामध्ये कॉम्रेड धनाजी गुरव यांचे 'भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी अक्षय फुलारे हे अध्यक्ष स्थानी होते. तसेच मधुकर हुबाले, बाबुराव हुबाले, नानासो शिंदे, संजय हुबाले, सुनील फुलारे आदी मान्यवर उपस्थित होते.

26 फेब्रुवारी 2025 महाशिवरात्र

बुधवार दि. 26 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळच्या सत्रामध्ये हुबालवाडी गावातील रस्ते व विठ्ठल मंदिर परिसराची साफ-सफाई स्वच्छता करण्यात आली. गावातील तुंबलेले गटारे स्वच्छ केली. तसेच तुकाई मंदिर परिसराची स्वच्छता ही करण्यात आली. दुपारच्या सत्रामध्ये अभिसरण युथ एक्सचेंज प्रोग्रॅम अंतर्गत यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे झालेला शिबिरातील स्वयंसेवक विकास करे याने आपले अनुभव कथन केले. तसेच NRD कॅम्पसाठी निवड झालेला स्वयंसेवक श्री.सुशांत प्रकाश चव्हाण याने देखील आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथन केले. सायंकाळच्या सत्रामध्ये मा.भास्कर सदाकळे यांचे 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवृत्त मुख्याध्यापिका सौ मंगल प्रकाश कणप या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.

रात्रीच्या सत्रामध्ये मा. संजय विठ्ठल हुबाले (तात्या) यांचे प्रबोधनात्मक किर्तन झाले यामध्ये स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणामध्ये सहभाग घेतला होता.

**27 फेब्रुवारी 2025**

गुरुवार दि. 27 फेब्रुवारी 2025 रोजी संपूर्ण गावातील मुख्य रस्त्यांची साफसफाई व स्वच्छता करण्यात आली दुपारच्या सत्रामध्ये स्वयंसेवक रोहित जयवंत सुतार याने पॉवर वाक, स्त्री पुरुष समानता, जातिभेद निर्मूलन विषयक माहिती दिली तसेच श्री प्रसाद राजेंद्र पाटील यांनी युथ एक्सचेंज प्रोग्राम मधील आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथन केले.

सायंकाळच्या सत्रामध्ये वाळवा तालुका विधी सेवा समिती व वकील संघटना इस्लामपूर यांच्यावतीने माननीय न्यायाधीशसो जिल्हा व सत्र न्यायालय इस्लामपूर यांच्या वतीने 'कायदा मार्गदर्शन शिबिराचे' आयोजन

करण्यात आले होते. यामध्ये श्री. पी.एच. पंचोली यांचे ‘पालकांचे देखभाल कल्याण आणि ज्येष्ठ नागरिक कायदा’, श्री. पी.एम. चितळे यांचे ‘मराठी भाषा संवर्धन दिन’, श्री. विजय चौखंडे यांचे ‘माहिती अधिकार 2005’ श्री. अनिरुद्ध सुभाष गांधी यांचे ‘POCSO Act व MV Act’ या विषयावर मार्गदर्शन झाले. प्रमुख उपस्थितीमध्ये कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. पी.व्ही. गायकवाड सर तसेच कला व वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. संतोष नांगरे, प्रा. अंगद पाटील, संदीप पाटील, प्रा. सागर पारधी, डॉ. प्रकाश चव्हाण, अभिजित चव्हाण, प्रा. निवृत्ती शिंदे, डॉ. तेजपाल जगताप, प्रा. माळी हे उपस्थित होते.

रात्रीच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी ‘सांस्कृतिक कार्यक्रमाचे’ आयोजन करण्यात आले होते यामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला गावातील नागरिकांची मोठ्या प्रमाणामध्ये उपस्थिती होती.

28 फेब्रुवारी 2025 समारोप समारंभ

शुक्रवार दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे इस्लामपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक माननीय संजय हारूगुडे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूरचे प्राचार्य प्रोफेसर नितीन शिंदे हे होते प्रमुख उपस्थितीमध्ये कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील सर, हुबालवाडी गावातील ज्येष्ठ उद्योगपती व राजारामबापू बँकेचे माजी संचालक बाबुराव हुबाले गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच सौ. सुवर्णा सुनील फुलारे, अंकुश घाडगे, रेखाताई पवार, श्रीमती शमशाद मुलाणी तसेच आजी-माजी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्यासह ग्रामपंचायत मधील सर्व कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विशेष श्रमसंस्कार शिबिरातील काही क्षणचित्रे**



**शिबिराचे उद्घाटन करताना हुबालवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. मंगल हुबाले**



**शिबिराचे प्रमुख पाहुणे मा. श्रीधर कुलकर्णी कृषी ग्राम विस्तार अधिकारी**



**उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष उद्योजक मा. बाबुराव हुबाले**




**बिरोबा मंदिराचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी विटा स्थलांतरीत करताना स्वयंसेवक**







गावातील कुटुंबियांचा सर्व्हे करताना स्वयंसेविका




मा. सर्जेराव टकले सर योग प्रशिक्षण देताना


GPS Map Camera
Hubalwadi, Maharashtra, India
474p+23x, Hubalwadi, Maharashtra 415414, India
Lat 17.104956° Long 74.28487°
24/02/2025 12:34 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Hubalwadi, Maharashtra, India
472m+qh5, Dhangar Raja Shri Biroba Road, Hubalwadi, Maharashtra 415409, India
Lat 17.101915° Long 74.284299°
24/02/2025 11:34 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Hubalwadi, Maharashtra, India
472m+qh5, Dhangar Raja Shri Biroba Road, Hubalwadi,
Maharashtra 415409, India
Lat 17.103133° Long 74.283535°
25/02/2025 09:10 AM GMT +05:30
Google

स्मशानभूमीत परिसराची स्वच्छता करताना




हुबालवाडी गावातील रस्ते सफाई करताना



हुबालवाडी गावातील रस्ते सफाई करताना




'बदलत्या पर्यवारणाचा मानवी जीवनावर होणारा बदल' याविषयावर मार्गदर्शन करताना डॉ. अनिल पाटील, पत्रकार पुढारी, पणजी




‘कायदा मार्गदर्शन शिबिरात’ मार्गदर्शन करताना महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन.आर.पाटील (काका)




कायदा मार्गदर्शन शिबिरात मार्गदर्शन करताना मा. न्यायाधीश अनिरुद्ध गांधी



मा.संजय तात्या हुबाले यांच्या प्रबोधनात्मक कीर्तनात सहभागी स्वयंसेवक



भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव यावर बोलताना कॉम्रेड धनाजी गुरव




अंधश्रद्धा निर्मुलन यावर प्रबोधनात्मक व्याख्यान देताना मा. भास्कर सदाकळे





'सह्याद्रीच्या कुशीत हवा शिवरायांचा जन्मनवा' या विषयावर व्याख्यान देताना ॲड. उदयकुमार मोरे (शिरोळ) यांच्या




गटार स्वच्छता करताना स्वयंसेवक




गटारातील गाळ काढून स्वच्छता करताना स्वयंसेवक




शाळा परिसराची स्वच्छता करताना




गटार स्वच्छता करताना स्वयंसेवक





कमलनगर वस्तीमध्ये स्वच्छता करताना



सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेताना ग्रामस्थ




शिबिर समारोप प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे पोलिस निरीक्षक मा.संजय हारुगडे




शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.नितीन शिंदे



पुढारी

www.pudhari.com

## केबीपीच्या मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राचे श्रमसंस्कार शिबिर

इस्लामपूर : पुढारी वृत्तसेवा

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील (केबीपी) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राचे विशेष श्रमसंस्कार शिबिर हुबालवाडी (ता. वाळवा) येथे दि. २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत होत आहे.

भारतासाठी युवक आणि डिजिटल साक्षरतेसाठी युवक अशी यावर्षीच्या शिबिराची मुख्य संकल्पना आहे. वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, बीजसुरक्षा, रोपलागण, हरितग्राम, जंगल व वृक्ष बचाव, उन्हाळ्यामध्ये पक्षी व प्राण्यांसाठी जलकुंड तयार करणे, प्लास्टिक मुक्ती, ध्वनी-जल-मृदा प्रदूषण प्रतिबंधन, आरोग्य शिबिर, महिला सक्षमीकरण, व्यसन आणि अंधश्रद्धा निर्मूलन, सौरऊर्जा जागृती, स्व - सुरक्षा प्रशिक्षण, आर्थिक साक्षरता, आयुष्यमान भारत (आभा कार्ड) इत्यादी उपक्रम शिबिरात राबवले जात आहेत.

या निमित्ताने विविध विषयांवर श्रीधर कुलकर्णी, अनिल पाटील, अॅड. अनिल पाटील, कॉ. धनाजी गुरव, भास्कर सदाकळे, संजय हारुगडे यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्थेच्या सचिव सरोज पाटील, संस्थेचे अध्यक्ष अॅड. एल. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील आणि प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार केंद्र संयोजक प्रा. एकनाथ पाटील, केंद्र सहायक प्रा. संभाजी पाटील आणि तांत्रिक सहायक अभिजित पाटील शिबिराचे संयोजन करीत आहेत.

Sangli Edition
Feb 26, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com



दैनिक जनप्रवास

## व्यक्तिमत्व विकासात एनएसएसची भूमिका महत्त्वाची

■ श्रीधर कुलकर्णी : हुबालवाडीत श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहात

सांगली । ■ बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५ | ९

# संविधान समजून त्याचा प्रचार गरजेचा : धनाजी गुरव

इस्लामपूर, ता. २७ : भारतीय संविधान यावेळी कधी नव्हे, इतके धोक्यात असून आपली लोकशाही शाबूत ठेवायची असेल तर संविधान समजून त्याचा प्रचार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन धनाजी गुरव यांनी केले आहे. महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने हुबालवाडी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये ते भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. अक्षय फुलारे अध्यक्षस्थानी होते. भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

गुरव म्हणाले, "राज्यघटनेमुळे स्त्री व अस्पृश्यांना स्वाभिमानाने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देऊन त्यांचा सर्वांगीण विकासासाठी विविध स्वरूपांच्या सोयी सुविधांची तरतूद केली"

अक्षय फुलारे यांनी शिक्षणातील संभाव्य धोके ओळखणे आज काळाची गरज आहे व नेतृत्व आपण स्वतः करण्यास सुरुवात करणे देखील महत्त्वाचे असल्याचे सांगितले. बाबूराव हुबाले, सौ मंगल हुबाले, सुनील फुलारे, संजय हुबाले, मधुकर हुबाले, प्रकाश शिंदे, विजय हुबाले, कृष्णा हुबाले उपस्थित होते. सत्यजित पाटील यांनी स्वागत केले. आयुष पाटील यांनी आभार मानले.

सकाळ TODAY

# हुबालवाडीत श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

इस्लामपूर, ता. ३ : 'विद्यार्थ्यांचो व्यक्तिगत व सामाजिक विकासासाठी स्वतःच्या अंगी काही क्षमता कमवाव्या लागतात, त्यासाठी कॉलेजातील एनएसएसचे श्रम शिबिर या क्षमतांना वाढवते,' असे मत इस्लामपूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय हारुगडे यांनी मांडले.

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हुबालवाडी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप वेळात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे अध्यक्षस्थानी होते.

हारुगडे म्हणाले, "विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, सहकार्य, देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य विकसित करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली आहे. विद्यार्थ्यांनी श्रम संस्काराच्या माध्यमातून स्वावलंबी बनणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक व पालकांचा आदर करत त्यांची मान अभिमानाने उंचावेल, अशी कामे करावीत." प्राचार्य नितीन शिंदे म्हणाले, "अशी शिबिरे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका निभावतात. या माध्यमातून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो. याकरिता विद्यार्थ्यांनी या प्रकारच्या शिबिरात सहभागी होणे आवश्यक आहे. त्यांना लाभ त्यांना व्यक्तिगत तर होतोच पण समाजालाही होतो."

डॉ. प्रकाश आठवले यांनी स्वागत, प्रा. संदीप पाटील यांनी आभार, प्रा. वंदना पाटील, अश्विनी थोरात यांनी सूत्रसंचालन केले. राजारामबापू बँकेचे माजी संचालक बाबूराव हुबाले, सरपंच सौ. मंगल हुबाले, उपसरपंच सौ. सुवर्णा फुलारे, संजय हुबाले, सुनील फुलारे उपस्थित होते.

सांगली, मंगळवार, ४ मार्च २०२५ २

पुण्य नगरी



इस्लामपूर : हुबालवाडी येथे व्याख्यानात बोलताना कॉ. धनाजी गुरव.

# संविधान समजून घेणे गरजेचे : कॉ. धनाजी गुरव

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** भारतीय संविधान यावेळी कधी नव्हे इतके धोक्यात असून आपली लोकशाही शाबुत ठेवायची असेल तर संविधान समजून त्याचा प्रचार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कॉ. धनाजी गुरव यांनी केले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या वतीने हुबालवाडी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अक्षय फुलारे हे होते. यावेळी बाबुराव हुबाले, मंगल हुबाले, सुनील फुलारे, संजय हुबाले, मधुकर हुबाले, प्रकाश शिंदे, विजय हुबाले, कृष्णा हुबाले व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते. स्वागत सत्यजित पाटील याने केले तर आभार आयुष पाटील याने मानले.

Sangli Edition
Feb 28, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

तरुण भारत

# भारतीय राज्यघटनेच्या चौकटीला धोका

## धनाजी गुरव : अमृतमहोत्सवी वर्षात संविधान धोक्यात

प्रतिनिधी / इस्लामपूर



इस्लामपूर : हुबालवाडी येथे भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव या विषयावर व्याख्यान देताना कॉ. धनाजी गुरव.

[illegible]

शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५

**सकाळ TODAY**

## कर्मवीर महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर

इस्लामपूर, ता. १ : येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे हुबालवाडी विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर सदाकळे होते. मंगल कणप अध्यक्षस्थानी होत्या.

भास्कर सदाकळे म्हणाले, जगामध्ये विज्ञान तंत्रज्ञानाचा एका बाजूला प्रचंड विकास होत असताना भारतामध्ये बुवाबाजी आणि भोंदू महाराज यांच्या माध्यमातून समाजामध्ये प्रचंड अंधश्रद्धा निर्माण होत आहेत.

मंगल कणप म्हणाल्या, समाजामध्ये दिवसेंदिवस भोंदूगिरी वाढत आहे. यामध्ये स्त्रिया बळी पडत आहेत. अभिषेक पांचाळ याने स्वागत केले. श्रेयस कुंभार याने आभार मानले. तेजस जंगम यांनी सुत्रसंचालन केले. बाबुराव हुबाले, सरपंच सौ. मंगल हुबाले, सुनील फुलारे, मधुकर हुबाले उपस्थित होते.

सांगली, रविवार, २ मार्च २०२५ २

---

**दैनिक जनप्रवास**



कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हुबालवाडी येथील कमलनगर येथे स्वच्छता मोहीम राबवली.

## 'कर्मवीर'च्या विद्यार्थ्यांची हुबालवाडीत स्वच्छता मोहीम

जनप्रवास । इस्लामपूर

[illegible]

सांगली | शनिवार दि. १ मार्च २०२५ ८

---

**सकाळ TODAY**

## कर्मवीर महाविद्यालयातर्फे स्वच्छता मोहीम

■ सकाळ वृत्तसेवा

[illegible]

सांगली | शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२४

---

**पुण्य नगरी**

## हुबालवाडीत के.बी.पी.चे विशेष श्रमशिबीर

इस्लामपूर / प्रतिनिधी

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर २२ ते २८ फेब्रुवारी अखेर हुबालवाडी येथे संपन्न होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन ॲड. एन. आर. पाटील यांच्या हस्ते होणार असून, उद्घाटन सत्राचे प्रमुख अतिथी कृषी ग्रामविस्तार अधिकारी श्रीधर कुलकर्णी हे असणार आहेत. या सत्राचे अध्यक्ष कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे हे आहेत. या शिबिरामध्ये अनिल पाटील, उदयकुमार मोरे, धनाजी गुरव, भास्कर सदाकळे यांचे व्याख्यान होणार आहे. सोमवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात येणार आहे. समारोप सत्रासाठी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक संजय हरगुडे व अध्यक्ष राजारामबापू बँकेचे माजी संचालक बाबुराव तुकाराम हुबाले हे आहेत. या शिबिराचे संयोजक डॉ. प्रकाश आठवले, डॉ. संतोष खडसे, प्रा. संदीप पाटील, सरपंच मंगल हुबाले, उपसरपंच सुवर्णा सचिन फुलारे व सर्व ग्रामपंचायत सदस्य करीत आहेत.

Sangli Edition

Feb 22, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

पुण्यनगरी



हुबालवाडी : श्रमसंस्कार शिबीर उद्घाटनप्रसंगी बोलताना श्रीधर कुलकर्णी, समवेत बाबुराव हुबाले, सरपंच मंगल हुबाले, रेखाताई पवार व अन्य मान्यवर.

## पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे : श्रीधर कुलकर्णी

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** पर्यावरणाचे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे आपण पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे, असे मत वाळवा पंचायत समितीचे ग्रामविस्तार अधिकारी श्रीधर कुलकर्णी यांनी व्यक्त केले. हुबालवाडी (ता. वाळवा) येथील के. बी. कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सरपंच मंगल हुबाले, उद्योजक बाबुराव हुबाले यांची प्रमुख उपस्थिती होती. संजय हुबाले, सुनील फुलारे, रेखाताई पवार, अंकुश घाटगे, मधुकर हुबाले, कृष्णा हुबाले, प्रकाश शिंदे, सुकुमार हुबाले, अधिकराव जाधव, जवकर पवार, लालासो पवार, अक्षय फुलारे, केशव हुबाले व सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. स्वागत डॉ. प्रकाश आठवले यांनी केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. वंदना पाटील व अश्विनी थोरात यांनी केले.

Sangli Edition
Feb 25, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

प्रखर राष्ट्रीय मराठी दैनिक

पुढारी

www.pudhari.com



## व्यक्तिमत्त्व विकासात शिबिरांची भूमिका महत्त्वाची : कुलकर्णी

My Sangli Edition
Feb 25, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

पुढारी



व्यक्तिमत्त्व विकासात शिबिरांची भूमिका महत्त्वाची : कुलकर्णी

My Sangli Edition
Feb 25, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्यनगरी



हुबालवाडी : श्रमसंस्कार शिबीर उद्घाटनप्रसंगी बोलताना श्रीधर कुलकर्णी, समवेत बाबुराव हुबाले, सरपंच मंगल हुबाले, रेखाताई पवार व अन्य मान्यवर.

पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे : श्रीधर कुलकर्णी

Sangli Edition
Feb 25, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

दैनिक जनप्रवास

## व्यक्तिमत्व विकासात एनएसएसची भूमिका महत्त्वाची

**■ श्रीधर कुलकर्णी : हुबालवाडीत श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहात**



सांगली | ■ बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५ | ९

## हुबालवाडीत केबीपीचे श्रमसंस्कार शिबिर

प्रतिनिधी
इस्लामपूर

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने हुबालवाडी येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर पार पडले. या शिबारार्थी विद्यार्थ्यांनी केलेल्या लोकोपयोगी कामामुळे आणि शिबिरात दररोज मान्यवर वक्त्यांनी केलेल्या प्रबोधनामुळे गावात विधायक जागृती निर्माण झाल्याचे समाधान समारोपाच्या वेळेस ग्रामस्थ व गावातील मान्यवरांनी व्यक्त केले.

सात दिवसीय शिबिरामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील एकूण १०० विद्यार्थी सहभागी होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास करण्याच्या दृष्टीने त्यांचा दिनक्रम निश्चित केलेला होता.

त्यामध्ये डॉ.अनिल पाटील यांचे 'बदलत्या पर्यावरणाचा मानवी जीवनावरील परिणाम', ॲड उदयकुमार मोरे यांचे 'सह्याद्रीच्या कुशीत हवा, शिवरायांचा जन्मनवा', कॉम्रेड धनाजी गुरव यांचे 'भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव', म्मास्कर सदाकळे यांचे 'अंधश्रद्धा निर्मूलन' व न्यायाधीश व वकील विधीसेवा समिती, जिल्हा व सत्र न्यायालय इस्लामपूर यांच्यावतीने 'कायदेविषयक मार्गदर्शन' शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये वृक्ष संवर्धन, जलसंवर्धन, बीजसुरक्षा, रोप लावून, हरितग्राम, उन्हाळ्यामध्ये पक्षी व प्राण्यांसाठी जलकुंड तयार करणे, उपक्रम राबवण्यात आले.